# पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर

1560
12/12/17

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFACTION/ ६९ /2017
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :- 06112017
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

## "वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

नौपाडा परिसरातील राम मारूती रोड व क्रॉस रोड तसेच लगतचे जोशी मार्ग व महात्माफुले रोड लगत दुकाने ,विविध आस्थापना ( बाजारपेठ ) असून नमुद मार्गावर पी–१,पी–२ प्रमाणे वाहनासाठी पार्किंग व्यवस्था देण्यात आलेली आहे. सदरचा मार्ग ठाणे स्टेशन पासून जवळ असल्याने ठाणे शहरातील आजुबाजूच्या परिसरातील मुंबई व इतर ठिकाणी कामास जाणारे बहुतांश नागरीक त्यांची वाहने नमूद मार्गावर दिवसभरासाठी पार्किंग करून जात असल्यामुळे त्यांच्या वाहनांची पार्किंग तसेच बाजारपेठेत येणारे ग्राहकांचे वाहनांची भर पडून पार्किंग व्यवस्था असून देखील वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याने राम मारूती रोड, महात्मा फुले रोड व जोशी मार्गावरील वाहतूक सुनिश्चित होण्याकरीता आमजनतेच्या सोईसाठी,

महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मी अमित का.काळे, ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या शहर वाहतुक शाखेचा पोलीस उप आयुक्त म्हणून मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून, यापुर्वीची पार्किंग अधिसुचनेत अंशतः खालील प्रमाणे बदल करण्यात येवून खालील प्रमाणे नव्याने वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

**राम मारूती रोड व क्रॉस रोड तसेच लगतचे जोशी मार्ग व महात्मा फुले रोडवर पी–१,पी–२ प्रमाणे वाहनाठी पार्किंग, व्यवस्था रोड लगत असलेल्या रहिवासी सोसायटी गेट, गल्लीचे मार्ग, क्रॉस रस्ते –कॉर्नर, शाळा ,दवाखाने यांचे गेट सोडून करण्यात येत आहे.**

१) नौपाडा येथील गजानन महाराज चौका कडून समर्थ भांडार दुकान, गोखले रोड दरम्यान राम मारूती रोडवर सकाळी ०७.०० ते १५.०० वा पावेतो रोडचे डावे बाजूस व दुपारी १५.०० ते सकाळी ०७.०० वा. पावेतो दरम्यान रोडचे उजवे बाजूस दुचाकी व हलक्या वाहनांस ( कार,जीप इत्यादी साठी समांतर ) पार्किंग करण्यास मुभा देण्यात येत आहे.

२) राम मारूती क्रॉस रोड वरील शाह कलेक्शन दुकान ते नवराई दुकाना पर्यंत बाजूस सकाळी ०७.०० ते १५.०० वा. पर्यंत तसेच बँक ऑफ बडोदा ते कॉटन किंग या दुकाना पर्यंत दरम्यान दुपारी १५.०० ते सकाळी ०७.०० वा. पावेतो दुचाकी व हलक्या वाहनांस ( कार,जीप इत्यादी साठी समांतर ) पार्किंग करण्यास मुभा देण्यात येत आहे.

३) गोखले रोडकडून सत्यम कलेक्शनकडे येणाऱ्या महात्मा फुले रोडवरील वुड लँड शुज,केंब्रीज दुकान,कुमार प्लॅस्टिक ,दुपट्टा घर, विनी कलेक्शन ,प्रसाद बंगला ,मधु मिलींद सोसायटी ,झवेरी सोसायटी कडील बाजूस सकाळी ०७.०० ते १५.०० वा. पावेतो व याच मार्गावरील विरूध्द बाजूस दुपारी १५.०० ते सकाळी ०७.०० वा. पावेतो दुचाकी व हलक्या वाहनांस( कार,जीप इत्यादी साठी समांतर ) पार्किंग करण्यास मुभा देण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन १५ दिवस प्रायोगिक तत्वावर लागु करण्यात येत असुन कोणाची काही हरकत अगर सुचना असल्यास त्या लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा, कार्यालय वाहतुक विभाग, तीन हात नाका, ठाणे ४००६०२ अथवा पोनि नौपाडा वा.उपविभाग ठाणे येथे पाठवाव्यात. सदरबाबत कोणाच्या काही सुचना अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरची अधिसुचना पुढील आदेश होई पावेतो कायम स्वरुपात अमलात राहील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही .

( अमित वा. काळे )
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा ,
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/—सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. आयुक्त, महानगरपालिका,ठाणे.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे
पोलीस उप आयुक्त,परिमंडळ—१,ठाणे / विशेष शाखा, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, १ ए.एस.कक्ष,ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ ठाणे वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी नौपाडा वाहतुक उपविभाग.
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्याकडुन आवश्यक सुचना फलके लावुन घ्यावीत.

Scanned by CamScanner